वसा सक्षम मातृत्वाचा
MOM-able™
फर्टिलिटी अँड टेस्ट ट्यूब बेबी सेंटर
सोमवार ते शनिवार सकाळी १० ते ४
आता मुंबई, पुणे, नाशिक या शहरात जाण्याची गरज नाही
IVF
ट्रिटमेंटने घ्या मातृत्वाचा आनंद आपल्या संगमनेरमध्ये
आजच आपली अपॉईंटमेंट बुक करा
8080 215 215
9699 327 301
दुसरा मजला, संजीवन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर नाशिक-पुणे रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 34, 570/-
20 कॅरेट मणी = 1, 22, 345/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 10, 100/-
16 कॅरेट मुरणी = 97, 870/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८४ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । ०७/०४/२०२६ । पान - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# सुकेवाडी-घुलेवाडी परिसरात अपघात

## कंटेनर घरात घुसला; वृद्ध महिला गंभीर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी-घुलेवाडी शिवारात आज सकाळी एक भीषण अपघात घडून एका वृद्ध महिलेला गंभीर दुखापत झाली आहे. नाशिक-अहिल्यानगर बायपासवरील या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच १७-६८४७ क्रमांकाचा रिकामा कंटेनर घुलेवाडीच्या दिशेने येत होता. मात्र चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने हा कंटेनर रस्त्यालगत असलेल्या पपईच्या शेतात घुसला. पुढे जाताना कंटेनरने शेतातील घराची भिंत तोडून थेट घरात प्रवेश केला.

यावेळी घरासमोर बसलेल्या सत्यभामाबाई सातपुते (वय अंदाजे ६५ वर्षे) या अचानक कंटेनरच्या खाली सापडल्या. त्यांच्या हातावरून कंटेनर गेल्याने हात गंभीर जखमी होऊन निकामी झाल्याची माहिती मिळाली आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ धाव घेत महिलेला कंटेनरखालून बाहेर काढले आणि उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, अपघातानंतर कंटेनर चालक घटनास्थळावरून फरार झाला असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. विशेष म्हणजे या परिसरातून वाळू तस्करी, मुरूम वाहतूक करणारी तसेच ओव्हरलोड ट्रक मोठ्या वेगाने धावत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. त्यामुळे अशा अपघातांची पुनरावृत्ती होत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, भरधाव वाहनांवर नियंत्रण आणणे, ओव्हरलोड वाहतुकीवर कठोर कारवाई करणे आणि वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचे सांगितले आहे. अन्यथा भविष्यात अशा दुर्घटना पुन्हा घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# एरंडे फाईलमधून लैंगिक शोषणाचा काळाकुट्ट चेहरा उघड

## नोकरीच्या आमिषाने महिलांची फसवणूक; ८७ अश्लील व्हिडिओ जप्त

### तपासात धक्कादायक खुलासे

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - सातपूर परिसरातील कथित एरंडे फाईल प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून अश्लील व्हिडिओ निर्मिती आणि महिलांच्या लैंगिक शोषणाच्या या रॅकेटचा तपास पोलिसांकडून युद्धपातळीवर सुरू आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित तथाकथित पत्रकार रवींद्र एरंडे याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या डिजिटल उपकरणांमधील डेटा रिकव्हर करणे हे सध्या तपासातील सर्वात मोठे आव्हान ठरले आहे.

पोलिसांनी आतापर्यंत एरंडेकडून ४ मोबाईल, २ पेनड्राइव्ह आणि १ मेमरी कार्ड जप्त केले आहे. तसेच त्याच्या कार्यालयावर छापा टाकून महत्त्वाची कागदपत्रे ताब्यात घेण्यात आली आहेत. जप्त केलेल्या उपकरणांमधील डिलीट केलेला डेटा सायबर तज्ज्ञांच्या मदतीने रिकव्हर करण्याचे काम सुरू असून, त्यातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तपासादरम्यान एरंडेच्या टॅबमध्ये तब्बल ८७ अश्लील व्हिडिओ आढळून आल्याने या प्रकरणाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या व्हिडिओंचा वापर केवळ ब्लॅकमेलसाठी केला जात होता की त्यांची विक्रीही केली जात होती, याचा पोलिस विविध अंगांनी तपास करत आहेत. या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा अत्यंत नाट्यमय पद्धतीने झाला. सुरुवातीला स्वतःला पीडित दाखवत एरंडेनेच चार जणांविरुद्ध १२ लाख रुपयांची खंडणी मागितल्याची तक्रार सातपूर पोलिस ठाण्यात दाखल केली होती. त्या आधारे पोलिसांनी चार जणांना अटकही केली.

मात्र पुढील तपासात एरंडेच्याच डिव्हाइसमधून मोठ्या प्रमाणावर अश्लील व्हिडिओ सापडल्याने प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. खोटा बनाव रचून इतरांना अडकवण्याचा प्रयत्न करणारा तक्रारदारच या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी त्यालाच अटक केली.



**तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, एरंडे गरजू महिलांना नोकरीचे आमिष दाखवत त्यांच्याशी ओळख वाढवत असे. त्यानंतर त्यांचे अश्लील व्हिडिओ तयार करून त्यांचा गैरफायदा घेत ब्लॅकमेल केले जात असल्याचा आरोप आहे.**

आतापर्यंत ८ पीडित महिलांची ओळख पटली असून, त्यामध्ये अंगणवाडी सेविका, आशा वर्कर तसेच खासगी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या महिलांचा समावेश आहे. आणखी अनेक महिला या जाळ्यात अडकल्या असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणात नाशिक आणि इगतपुरी येथील विविध हॉटेलमध्ये अश्लील व्हिडिओंचे चित्रीकरण करण्यात आल्याचा दाट संशय व्यक्त करण्यात येत आहे. (पान ६ वर)

# काँग्रेसचे संघटन सृजन अभियान सर्वांना सोबत घेणारे - राजेश ठाकूर

## युवक, महिला सर्व समाजघटकांना सोबत घेण्याचा काँग्रेसचा निर्धार



संगमनेर (प्रतिनिधी)-

खा. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेमधून देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या भावना समजून घेतल्या. देशात सध्या जातीपातीचे आणि भेदभावाचे राजकारण सुरू आहे. हे देशासाठी धोकादायक असून या विरुद्ध सर्वांना सोबत घेऊन काँग्रेस लढत आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये काँग्रेस आगामी काळात अधिक सक्षम होणार असून काँग्रेस पक्षामध्ये तरुणांना मोठी संधी आहे. पक्षाने सुरू केलेले संघटन सृजन अभियान हे सर्व जाती धर्म , युवक नागरिक महिला या सर्वांना सोबत घेणारे असल्याचे प्रतिपादन झारखंड राज्याचे माजी प्रदेशाध्यक्ष राजेश ठाकूर यांनी केले आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळ येथे तालुका काँग्रेसच्या वतीने आयोजित संघटन सृजन अभियान कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर ओडिसाचे माजी मंत्री सरत राऊत, लातूरचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव श्रीकृष्ण सांगळे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, सौ. दुर्गाताई तांबे, ॲड. माधवराव कानवडे, श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाने, सौ. प्रभावतीताई घोगरे, मधुकरराव नवले, गिरीजा पिचड, बाबासाहेब दिघे, शिवाजी नेहे, उत्तमराव मते, मामा पगारे, डॉ. हरिओम पवार, शरद नाना थोरात, सचिन चौगुले, हसन भाई पटेल, सुरेश झावरे, पद्मा थोरात, ज्ञानदेव वापारे, लक्ष्मणराव कुटे, पांडुरंग पाटील घुले, सोमेश्वर दिवटे, निखिल पापडेजा, रामहरी कातोरे, शेखर सोसे, नवनाथ आरगडे, के. के. थोरात, प्रमिला अभंग, कर्जतचे तालुकाध्यक्ष किरण पाटील, ॲड. पंकज लोंढे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना झारखंडचे माजी प्रदेशाध्यक्ष राजेश ठाकूर म्हणाले की महाराष्ट्र आणि अहिल्यानगर जिल्हा हा काँग्रेसच्या विचारांचा बालेकिल्ला राहिला आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्यांचा शाश्वत विचार असलेली काँग्रेसची विचारधारा प्रत्येक माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी युवकांनी अधिक सक्रिय झाले पाहिजे. काँग्रेस मधील कार्यकर्त्यांनी मरगळ झटकून देशांमध्ये सुरू असलेल्या एकाधिकारशाहीला रोखण्यासाठी अधिक सक्रियतेने काम करावे. देशामध्ये सध्या जातीचे आणि भेदभावाचे राजकारण सुरू आहे. खा.राहुल गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसचे संघटन सृजन अभियान हे एकीची भावना निर्माण करणारे आहे. सर्व कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या सुखदुःखात सहभागी होण्याबरोबर जनतेचे प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरले पाहिजे. या पक्षामध्ये तरुणांना अधिक संधी असून आगामी काळ हा काँग्रेसचा असेल असा विश्वास त्यांनी जनतेला दिला.

तर ओडिसाचे माजी मंत्री सरत राऊत म्हणाले की, उत्तर आणि दक्षिणेचा संगम हा संगमनेर मध्ये झाला आहे. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यातील सहकार शिक्षण आणि ग्रामीण विकास हा देशाला दिशादर्शक ठरणारा आहे. हा तालुका काँग्रेसच्या विचारांचा बालेकिल्ला असून आपल्याला पुन्हा काँग्रेसचा विचार प्रत्येक माणसापर्यंत पोहोचून संगमनेर ची ताकद राज्याला दाखवून द्यायचे असल्याचे ते म्हणाले.

# शिवभक्तावर जीवघेणा हल्ला

## ११ जणांवर गुन्हा, आरोपी फरार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक येथे अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेवाचे दर्शन घेऊन पायी परत येत असताना, कावड खांद्यावर असलेल्या शिवभक्तावर गावातीलच काही तरुणांनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपी सध्या फरार आहेत.

धांदरफळ बुद्रुक येथील रहिवासी मनोज सुरेश खुरपे (वय ३४) हे गावातील सुमारे ६० ते ७० शिवभक्तांसह शिखर शिंगणापूर येथे महाल काठी कावड घेऊन गेले होते. या यात्रेदरम्यान खुरपे यांच्याकडे जेवण व मुक्कामाची संपूर्ण जबाबदारी होती. दर्शन घेऊन परतीच्या प्रवासाला निघाल्यानंतर आंबेगाव तालुक्यात जेवण झाल्यानंतर बोरी आळे रोडवर ही घटना घडली.

यावेळी खुरपे यांच्या खांद्यावर कावड असतानाच गावातील काही तरुणांनी जेवण आणि मुक्कामाच्या नियोजनात मनमानी केली असा क्षुल्लक कारण काढत त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. या टोळक्याने खुरपे यांना बेदम मारहाण करत गंभीर जखमी केले. या हल्ल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.



जखमी अवस्थेत खुरपे यांच्यावर तातडीने उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांनी आळेफाटा पोलीस स्टेशन (जि. पुणे) येथे फिर्याद दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी प्रशांत बाळासाहेब कोल्हे, ओमकार अण्णासाहेब तोरकडी, संतोष सुनील शिंदे, प्रवीण कारभारी शिंदे, विशाल अशोक कोल्हे, कौस्तुभ संजय बिडवे, आशिष मच्छिंद्र कोल्हे, निखिल संजय जाधव, विकास गोरख कोल्हे, कार्तिक कैलास कोल्हे आणि एक अनोळखी इसम अशा एकूण ११ जणांविरुद्ध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेनंतर सर्व आरोपी फरार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. धार्मिक भावनेतून सुरू असलेल्या यात्रेत अशा प्रकारची हिंसक घटना घडल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.









## काँग्रेसकडून मोठे संघटनात्मक बदल

# ८००० नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र काँग्रेसने 'संघटना निर्मिती' अभियानांतर्गत मोठी पुनर्रचना सुरू केली आहे. आठ हजार नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल आणि पाच वर्षे पूर्ण केलेल्या जिल्हाध्यक्षांना हटवून नवीन चेहऱ्यांना संधी दिली जाईल. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष तळागाळाच्या स्तरावर स्वतःला मजबूत करण्यासाठी एक व्यापक पुनर्रचना मोहीम हाती घेत आहे. पक्षाने याला 'संघटना निर्मिती' कार्यक्रम असे नाव दिले आहे, ज्याअंतर्गत पुढील दोन महिन्यांत राज्यात मोठा फेरबदल करण्याची तयारी सुरू आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश संघटनेत नवीन ऊर्जा निर्माण करणे आणि आगामी निवडणुकांसाठी एक सक्षम संघ तयार करणे हा आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मते, पक्षाने जिल्हा आणि तालुका स्तरावर अंदाजे ८,००० नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. संघटनात्मक दृष्ट्या, महाराष्ट्रात सध्या काँग्रेसचे ६० जिल्हे आहे, त्यापैकी ४५ जिल्हाध्यक्षांना बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, पक्षाने अलीकडेच १२ नवीन संघटनात्मक जिल्हे तयार केले आहे अशाप्रकारे, राज्यात एकूण ५७ नवीन जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

# बिबट्याचा थरारक हल्ला; डॉक्टरसह तिघे गंभीर जखमी

आश्वी - संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर शिवारात रविवारी (दि. ५) सायंकाळी बिबट्याने केलेल्या सलग प्राणघातक हल्ल्यांनी संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. या थरारक घटनेत एका डॉक्टरसह तिघेजण गंभीर जखमी झाले असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आश्वी बुद्रुक येथील संदीप खेमनर हे आपल्या दोन पुतण्यांसह सायंकाळी सुमारे ७:४५ वाजता प्रवरा डाव्या कालव्यालगतच्या शेतातून गव्हाचा भुसा ट्रॅक्टरमध्ये भरून परतत होते. त्यावेळी अभिषेक केशव खेमनर (वय ३४) आणि सार्थक सुनील खेमनर (वय १७) हे दुचाकीवरून लेंडी नाल्याजवळून जात असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झडप घालत त्यांच्या वर हल्ला चढवला. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे दोघेही जखमी झाले.

जखमींच्या आरडाओरडामुळे परिसरातील ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेतली. बापूसाहेब निर्मळ, संदीप भुसाळ, विलास निर्मळ, सोमनाथ शिंदे, सचिन शिंदे, पप्पू होडगर आणि पप्पू निर्मळ यांनी प्रसंगावधान दाखवत मदत केली. नागरिकांची गर्दी वाढताच बिबट्याने जवळील शेतात उडी मारून पळ काढला. मात्र काही वेळातच बिबट्याने पुन्हा हल्ला करत उंबरी येथील डॉ. मारुती उंबरकर (वय ५२) यांना लक्ष्य केले. घरी जात असताना झालेल्या या हल्ल्यात ते देखील गंभीर जखमी झाले. तिन्ही जखमींच्या


एआय जनरेट फोटो


पाय व मांडीवर खोल जखमा झाल्या आहेत.

घटनेनंतर जखमींना तत्काळ निमगाव जाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. येथे डॉ. तय्यब तांबोळी यांनी प्राथमिक उपचार केले. आरोग्य सेविका वैशाली ठुबे, तेजस भांड आणि नरेंद्र पोटे यांनी उपचारात सहकार्य केले. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जनसेवा कार्यालयाने तत्काळ दखल घेत जखमींना पुढील उपचारासाठी नगर येथे हलवण्याची व्यवस्था केली तसेच डॉक्टरांना आवश्यक सूचना दिल्या.

वनविभागाचे अधिकारी वनपाल आर. के. पवार, वनसंरक्षक राहुल सातपुते, बाळासाहेब डेंगळे व अरुण साळवे यांनी रुग्णालयात भेट देऊन जखमींची विचारपूस केली व घटनास्थळी पंचनामा केला. या दुहेरी हल्ल्यामुळे उंबरी बाळापूर परिसरात भीतीचे सावट पसरले असून नागरिकांनी वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी जोरदार मागणी केली आहे.

# मंत्रालयात पुन्हा लाचखोरीचा स्फोट

## ६.३७ लाखांसह अधिकारी जाळ्यात



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याचं प्रशासन सेवेतलं सर्वोच्च स्थान, केंद्रबिंदु असलेल्या मंत्रालयात काही दिवसांपूर्वी एका अधिकाऱ्यास, मंत्र्याच्या स्वीय सहायकास लाच घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली होती. त्यानंतर, मंत्रालयातल्या आणखी एका अधिकाऱ्याला लाच घेतला लाच लुचपत प्रतिबंधन विभागाने अटक केली आहे. खारघर परिसरात लाच घेताना सापळा रचून एसीबीकडून लाचखोर अधिकाऱ्यास बेड्या ठोकण्यात आल्या. अर्थ व नियोजन विभागात कक्ष अधिकारी म्हणून असणारे विलास लाड यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. निधी मंजूर करून देण्यासाठी तब्बल ६ लाख ३७ हजार रुपयांची मोठी लाच घेताना अटकेची कारवाई करण्यात आली.

मंत्रालयातल्या कामासाठी लाच घेण्याचा प्रयत्न केल्याचं दुसर मोठ प्रकरण समोर आलं असून मंत्रालयातल्या लाचखोरीला चाप बसवण्यासाठी एसीबीने पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे. विशेष म्हणजे मार्च महिन्यात एसीबीने कारवाईचा धडाका लावला होता, तेव्हा मार्च एन्डमुळे ही कारवाई होत असल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात होती. मात्र, आता एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात एसीबीने पुन्हा एकदा आपला मोर्चा थेट मंत्रालयात वळवला आहे. मंत्रालयातील कक्ष अधिकारी असलेल्या विलास लाड याला रंगेहाथ अटक करण्यात आली. विशेष म्हणजे सर्वसामान्य माणसांचा एका वर्षाचा पगारही नसतो, तेवढी मोठी रक्कम लाच स्वरुपात हा अधिकारी एका दिवसात घेत होता. त्यामुळे, प्रशासन आणि सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार व सर्वसामान्यांची होणारी पिळवणूक हा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

ग्रामविकास विभागाचा निधी मंजूर करुन देण्यासाठी या अधिकाऱ्याने लाच मागितली होती, त्यानुसार ६ लाख ३७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने लाचखोर आरोपीस अटक केली. खारघर परिसरात एसीबीने ट्रॅप रचून ही कारवाई केल्याने मंत्रालयातील प्रशासकीय वर्तुळात आणि प्रशासनात खळबळ उडाली आहे.

# आठ दिवसांत महाराष्ट्रात राजकीय भूकंप'; नाना पटोले

मुंबई (वृत्तसंस्था)

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी दावा केला आहे की, येत्या आठ दिवसांत महाराष्ट्रात मोठा राजकीय भूकंप होऊ शकतो आणि भाजप आपल्या मित्रपक्षांना फोडण्यासाठी तथाकथित 'ऑपरेशन लोटस' सुरू करेल.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी भाकीत केले आहे की, येत्या आठ दिवसांत महाराष्ट्र एका मोठ्या राजकीय भूकंपाने हादरून जाईल. त्यांचा दावा आहे की, भारतीय जनता पार्टी (भाजप) यावेळी स्वतःच्याच मित्रपक्षांना फोडण्याचा कट रचत आहे आणि लवकरच 'ऑपरेशन लोटस' राबवले जाऊ शकते.नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, भाजपचा आपल्या मित्रपक्षांना संपवण्याचा इतिहास आहे. त्यांनी स्पष्ट केले की, पाच राज्यांच्या निवडणुकीचे निकाल लागण्यापूर्वीच येत्या काही दिवसांत मोठी राजकीय उलथापालथ पाहायला मिळेल. पटोले यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात कोणत्या पक्षात फूट पडण्याची शक्यता आहे, यावर चर्चा सुरू झाली आहे.

# संगमनेर भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर

## शहराध्यक्ष, माजी नगरसेवक हटविण्याची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - एकीकडे भाजपचा ४६ वा वर्धापनदिन साजरा करण्याचा गजर, तर दुसरीकडे ५० जणांच्या बंडखोरीच्या पत्राने संगमनेर भाजपमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आला आहे. शहराध्यक्ष आणि माजी नगरसेवकावर कारवाईची ठाम मागणी करत कार्यकर्त्यांनी थेट प्रदेशाध्यक्षांकडे धाव घेतली.

नगरपरिषद निवडणुकीत दारुण पराभवानंतर भाजपमधील अंतर्गत खदखद अखेर उफाळून आली. पक्षाची घडी बसविण्याऐवजी स्थानिक नेतृत्व एकमेकांचे पाय खेचण्यात गुंतल्याचा संताप कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. माजी नगरसेवक श्रीराम गणपुले यांच्यावर संघटना डावलून मनमानी कारभार, ए. बी. फॉर्म वाटपातील कथित गैरव्यवहार, अपात्र उमेदवारांना उमेदवारी असे गंभीर आरोप करण्यात आले.

निवडणुकीदरम्यान संघटनात्मक नेतृत्वाचा अभाव, कोलमडलेली प्रचारयंत्रणा आणि ढासळलेला कार्यकर्त्यांचा विश्वास या सगळयांमुळे पराभव ओढवला, असा ठपका ठेवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित पदाधिकाऱ्यांना तत्काळ पदावरून हटवून कठोर कारवाई करावी, अन्यथा असंतोष आणखी भडकणार, असा इशारा बंडखोर गटाने दिला आहे.

दरम्यान, शहराध्यक्षा पायल ताजणे म्हणाल्या, की पक्षात कोणताही अंतर्गत कलह नाही. पक्षविरोधात काम करणारे खोटा गाजावाजा करत आहेत. या अफवांचा पक्षावर कोणताही परिणाम होणार नाही. ५० सह्यांचे पत्र देणाऱ्यांनी यापूर्वीच्या ३०० सह्यांच्या पत्राचे काय झाले याचे आत्मपरीक्षण करावे.

# निंदनीय ॲसिड हल्ला; दोषींना लवकरच पकडू - ना. तटकरे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्याच्या ग्रामीण भागातील शालेय मुलीवर ॲसिड हल्ला प्रकरणाचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. तो तपास अधिकाधिक गतिमान करण्याच्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या यंत्रणांकडून मदत, सहकार्य घेतले जात आहे. हे काम पोलिस गतीने करत आहेत, असे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

संगमनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील एका गावात शालेय मुलीवर अज्ञाताने ॲसिड हल्ला केला होता. रविवारी (दि. ५) या मुलीची मंत्री तटकरे यांनी लोणी येथील प्रवरा रुग्णालयात भेट घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यांच्यासमवेत आमदार अमोल खताळ, आमदार काशिनाथ दाते, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार आदी उपस्थित होते.

यावेळी मंत्री तटकरे म्हणाल्या, शालेय मुलीवर ॲसिड हल्ल्याची निंदनीय घटना घडली. त्यावेळी अहिल्यानगर जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याशी त्वरित संपर्क केला होता. मुलीच्या कुटुंबाशी आमचा संपर्क झाला होता. जी पीडित मुलगी आहे, तिच्यावर सुरुवातीपासूनच लोणी येथील प्रवरा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिच्यावर आणखीन काही दिवस उपचार करावे लागणार आहेत. तिचे वय लहान असल्यामुळे आणि त्वचा सेन्सिटिव्ह असल्यामुळे अधिकची काळजी उपचारांमध्ये डॉक्टर, प्रशासन घेत आहेत. आज तिच्या कुटुंबाची सुद्धा भेट घेऊन संवाद साधला. मुलीचे एकदा विशेष समुपदेशकाकडून समुपदेशन झाले आहे. पुन्हा एकदा तिला अधिक चांगल्या पद्धतीचे समुपदेशन



देण्यासंदर्भात प्रशासन आणि पोलिस प्रशासन डॉक्टरांसोबत चर्चा करून निर्णय घेत आहेत. आमदार अमोल खताळ यांनीही सभागृहासमोर हे प्रकरण आणले. गृह विभाग, महिला आणि बालविकास विभागाची मनोधैर्य योजना आहे, त्यातून आणखीन अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मोफत उपचार करण्याबाबत सांगितलेले आहे.

# भोंदूबाबा अशोक खरातची ईडी चौकशी होणार - मुख्यमंत्री फडणवीस



मुंबई (वृत्तसंस्था)

सध्या राज्यासह देशात चर्चेत असलेल्या नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात याच्या काळ्या साम्राज्याचा पर्दाफाश करण्यासाठी विशेष तपास पथक अहोरात्र प्रयत्न करत आहे. शिर्डीतील जमीन फसवणूक प्रकरणात अशोक खरातची पत्नी कल्पना खरातला ताब्यात घेण्यासाठी एसआयटीचे पथक गेले असता ती पथकाला गुंगारा देण्यात यशस्वी ठरली. मात्र, यावेळी खरातचा मुलगा हर्षवर्धन खरात याला एसआयटीने चौकशीसाठी ताब्यात घेतले. एसआयटीने त्याची कसून चौकशी केली.

सध्या अशोक खरात प्रकरणाबद्दल रोज नवनवीन माहिती समोर येत आहे. अशातच आता या प्रकरणाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना मोठं वक्तव्य केलं आहे. भोंदू अशोक खरात प्रकरणातील सर्व व्यवहारांची ईडी चौकशी होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच भोंदू अशोक खरातवर आतापर्यंत एकूण १२ गुन्हे दाखल झाले असल्याची माहिती देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे.

अशोक खरातच्या संपत्तीची आणि गैरव्यवहारांची चौकशी केली जाईल. अशोक खरात प्रकरणात काही लोक राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण मी स्पष्ट सांगतो की अशा प्रकरणाबाबत सरकारला जे करायला पाहिजे ते सरकार करत आहे, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे. खरात प्रकरणातील व्यवहारांबाबत नक्कीच ईडी चौकशी होणार आहे. त्याबाबत ईडीने या गोष्टीची माहिती घेतली आहे. ईडीनेही त्यांची कारवाई सुरू केलेली आहे. एकदा खरातच्या जमिनी कुठे-कुठे आहेत, याची माहिती समजली की नियमानुसार जे-जे करावं लागेल ते आम्ही करणार आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.

# भारताच्या डिप्लोमेसीचे इराणकडून कौतुक

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

इराण आणि अमेरिका युद्ध पेटले आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इस्त्रायल आणि अमेरिकेने मोठा हल्ला इराणवर केला. त्यानंतर इराणकडून अमेरिकेच्या लष्कर तळांना टार्गेट करून हल्ले करण्यात आली. एक महिना युद्ध चालण्याचे संकेत होते. मात्र, एक महिना उलटूनही युद्ध काही थांबण्याचे नाव घेत नाही. इराणने या युद्धात होर्मुज खाडी बंद केली. होर्मुज खाडी बंद असल्याने जग जैरीस आले. तुर्की, इजिप्त आणि पाकिस्तान यांच्याकडून युद्ध थांबवण्याकरिता मध्यस्थी केली जात आहे. पण यश काही मिळत नाहीये. यादरम्यानच इराणकडून भारताचे कौतुक करण्यात आले. भारत युद्ध थांबवण्याची मागणी करत आहे. इराण आणि इस्त्रायल दोन्ही भारताचे मित्र आहेत. कोणत्याही पद्धतीने युद्ध अधिक भडकण्यापेक्षा युद्ध थांबवण्याची भूमिका भारताची आहे.इराणच्या सर्वोच्च नेत्यांचे भारतातील प्रतिनिधी अब्दुल माजिक हकीम इलाही यांनी यादरम्यानच्या परिस्थितीवर बोलताना म्हटले की, या युद्धात भारत महत्वाची भूमिका बजावू शकतो. भारताची डिप्लोमेसी खूप जास्त चांगली आहे. विशेष म्हणजे हे विधान अशावेळी आहे, होर्मुज खाडी खुली करण्यासाठी इराणला वेळ देण्यात आला.त्यांनी पुढे म्हटले की, भारत निश्चितपणे तणाव कमी करण्यात सकारात्मक भूमिका निभावू शकतो. आपल्या संतुलित परराष्ट्र धोरणामुळे भारत तणाव कमी करण्यास आणि संवादाला चालना देण्यास मदत करू शकतो, असेही त्यांनी म्हटले. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनीही एस. जयशंकर आणि रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांच्यावर फोनवरून संवाद साधला. इराणचे म्हणणे आहे की, अमेरिका आणि इस्त्रायल त्यांच्या पायाभूत सुविधा, हॉस्पिटल, शाळा, लोकवस्ती, कंपन्या, परमाणु केंद्रांना टार्गेट करून हल्ले करत आहेत.

# शिक्षण संस्था चालकांना कॉन्व्हेंट वरून बसणार चाप

मुंबई (वृत्तसंस्था)- शिक्षण विभागाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शाळांच्या नावाबाबतचा हा निर्णय आहे. आता फक्त ख्रिश्चन समुदायाद्वारे संचलित शाळांनाच कॉन्व्हेंट शब्द लावता येणार आहे. इतर शाळांना त्यांच्या नावापुढे कॉन्व्हेंट असा शब्द लावता येणार आहे. त्यामुळे अनेक शाळांना नाव बदलायला लागू शकतात. दरम्यान, काही दिवसांपूर्वी शाळांच्या नावाबाबत आणखी एक निर्णय झाला होता. फक्त आंतरराष्ट्रीय मंडळाशी संलग्न शाळांनाच युनिव्हर्सल, ग्लोबल, ऑक्सफर्ड सारख्या शब्दांचा वापर शाळेच्या नावात करता येईल. इतर शाळांना इंटरनॅशनल अशा पद्धतीच्या नावाचा उल्लेख करता येणार नाही. अनेक खाजगी संस्था स्वयंअर्थसाहित तत्त्वावर शाळा सुरू करून पालकांना, विद्यार्थ्यांना आकर्षित करतात. यासाठी शाळांच्या नावात आंतरराष्ट्रीय, ग्लोबल, वर्ड सैनिकी, ऑक्सफर्ड नावाचा वापर करतात. यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांची दिशाभूल होते. याबाबत आता शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून काही शब्दांच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले आहे. त्यामुळेच आता फक्त मान्यता असणाऱ्या शाळांनाच कॉन्व्हेंट आणि इंटरनॅशन,ग्लोबल अशा शब्दांचा वापर करता येणार आहे.

# पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांची भारताला धमकी



पाकिस्तानकडून कोलकात्यावर हल्ल्याची दिलेली धमकी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी सियालकोट येथे पत्रकारांशी संवाद साधताना हे विधान केल्याने तणाव वाढला आहे. विशेष म्हणजे सियालकोट ते कोलकाता हे हवाई अंतर सुमारे १६०० ते १७०० किमी असून रस्त्याने ते २ हजार किमीपेक्षा अधिक आहे. तरीही पाकिस्तानकडे इतक्या लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे असल्याचा दावा करण्यात आला आहे.

या दाव्याचा आधार म्हणजे 'शाहीन-३' हे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र. सुमारे २,७५० किमी रेंज असलेले हे पाकिस्तानचे सर्वात लांब पल्ल्याचे शस्त्र मानले जाते. २०१५ मध्ये याची पहिली चाचणी घेण्यात आली होती आणि आता ते पूर्णपणे कार्यान्वित असल्याचे सांगितले जाते. सॉलिड फ्यूलवर चालणारे हे क्षेपणास्त्र ट्रान्सपोर्टर इरेक्टर लाँचरद्वारे प्रक्षेपित केले जाऊ शकते. पारंपरिक तसेच आण्विक वॉरहेड वाहून नेण्याची क्षमता त्यात आहे.

शाहीन-३ व्यतिरिक्त पाकिस्तानकडे शाहीन-२ (१८०० किमी), शाहीन-१ (७५० किमी), गौरी (१५०० किमी) आणि बाबुर क्रूझ मिसाइल यांसारखी इतर क्षेपणास्त्रेही आहेत. 'अबाबिल' हे चखठत तंत्रज्ञान असलेले क्षेपणास्त्र एकाच वेळी अनेक लक्ष्यांवर मारा करू शकते. या सर्व क्षेपणास्त्रांमुळे भारतातील अनेक मोठी शहरे त्यांच्या टप्प्यात येतात, असा पाकिस्तानचा दावा आहे.

मात्र तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तानकडून अशा प्रकारच्या धमक्या प्रामुख्याने सामरिक प्रतिबंधासाठी दिल्या जातात. भारताकडेही अत्याधुनिक आणि अधिक लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे उपलब्ध आहेत. 'अग्नी-५'सारख्या मिसाइलची रेंज सुमारे ७००० किमी आहे. याशिवाय भारताची मल्टी-लेयर्ड एअर डिफेन्स सिस्टम शत्रूच्या क्षेपणास्त्रांना हवेतच नष्ट करण्यास सक्षम आहे.

त्यामुळे पाकिस्तानच्या धमकीकडे गांभीर्याने पाहिले जात असले तरी भारताची संरक्षण क्षमता लक्षात घेता कोणतीही संभाव्य परिस्थिती हाताळण्याची तयारी मजबूत असल्याचे स्पष्ट होते.र

# भाजपने डाव साधला, राहुरी पोटनिवडणुक बिनविरोध

युवावार्ता (प्रतिनिधी)

राहुरी - राहुरीत भाजपने शेवटच्या क्षणी डाव टाकलाच, विखे-पाटील, चव्हाणांची तनपुरेंशी चर्चा, थेट फडणवीसांनाच फोन लावून दिला अन बारामतीच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या मार्गातील बहुतांश अडथळे दूर झाल्यानंतर आता राहुरी विधानसभेची पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी भाजपने शेवटच्या क्षणी प्रयत्न केले आणि त्यात यश मिळाले.

राहुरीचे भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर ही जागा रिक्त झाली होती. याठिकाणी भाजपने त्यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली आहे. त्यांच्याविरोधात माजी राज्यमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते प्राजक्त तनपुरे हे रिंगणात उतरण्याच्या तयारीत होते. उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवशी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्राजक्त तनपुरे यांची भेट घेतली आहे. या तिन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाली. यावेळी रवींद्र चव्हाण यांनी प्राजक्त तनपुरे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरुन चर्चा करुन दिली. त्यामुळे आता प्राजक्त तनपुरे निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतील, अशी चर्चा रंगू लागली होती. आणि त्याप्रमाणे प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी पोटनिवडणुकीतून माघार घेतली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि पालकमंत्र्यांनी



मला विनंती केली आहे. विकासाचे प्रश्न मार्गी लावण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे. याबाबत मला कार्यकर्त्यांशी चर्चा करावी लागेल. माझा उमेदवारी अर्ज भरुन तयार आहे. ज्या मुद्द्यावर आपण निवडणूक लढवायचं म्हणतोय, तो मुद्दाच सोडवण्याची तयारी त्यांनी दाखवली असेल तर मला माझ्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन मला निर्णय घ्यावा लागेल त्याप्रमाणे आपण आपल्या माघारीचा निर्णय घेतला आहे. अशी प्रतिक्रिया प्राजक्त तनपुरे यांनी व्यक्त केली. बारामतीसह राहुरी पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी महायुती प्रयत्नशील होती. काँग्रेसच्या भुमिकेमुळे त्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मात्र काँग्रेसही एक पाऊल मागे घेत असल्याने या दोन्ही निवडणूका बिनविरोध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.















# देवगावच्या पाणीपुरवठा विहिरीत दूषित पाणी मिसळल्याने मासे मृत

## खराडी वाघापूर शिवार विहिरींचे पाणी न पिण्याचे आरोग्य विभागाचे आवाहन

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर नगरपालिकेचे दूषित पाणी थेट नदीपात्रात सोडले जात आहे, त्यामुळे प्रवरा नदी दूषित बनली आहे. हे दूषित पाणी वाघापूर खराडी शिवारातील विहिरीत मिसळल्याने मृत अवस्थेत मासे आढळून आले. तसेच पाण्यात बारीक बारीक आळ्या झाल्यामुळे हे पाणी पिण्यालायक राहिले नाही. त्यामुळे देवगावकरांनी या विहिरीचे पाणी पिऊ नये, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



वाघापूर-खराडी शिवारातील प्रवरा नदी पात्रामध्ये देवगाव, निमगाव, टेंभी, शिरापूर या गावासाठी सार्वजनिक पाणीपुरवठा करण्याची विहीर आहे. या विहिरीमध्ये केमिकलयुक्त दूषित पाणी मिसळल्याने मोठ्या प्रमाणात मासे मृतावस्थेत आढळून आले असून, त्या पाण्यात बारीक बारीक आळ्याही तयार झालेल्या आहेत. त्यामुळे हे पाणी पूर्णपणे दूषित झाले असून पिण्यास अयोग्य आहे. ही बाब देवगाव ग्रामपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी यांच्या लक्षात येतात, त्यांनी ग्रामपंचायत प्रशासनास ही माहिती दिली. माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते संजय देशमुख, प्रमोद शिंदे, संतोष शिंदे, सुनील शिंदे, नाना कोटकर, भास्कर बांगर, सचिन शिंदे, अण्णासाहेब भवर, देवगावच्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे समुदाय वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश अभंग, आरोग्य सहाय्यक सुरज जाधव, आरोग्य सेवक ओम येवले यांनी समक्ष खराडी वाघापूर शिवेवरील प्रवरा नदी पात्रातील पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीची पाहणी केली. असता त्या विहिरीत साचलेले मृत मासे, घाण आणि त्यातून तयार झालेल्या आळ्यांमुळे हे पाणी नागरिकांना तसेच जनावरांना पिण्यायोग्य राहिले नाही. परंतु वरील गावांसाठी पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था नसल्यामुळे, नाईलाजस्तव ग्रामस्थांना दूषित पाणी वापरण्याची वेळ आली आहे.

या केमिकलयुक्त पाण्याच्या बाबत देवगाव ग्रामपंचायत प्रशासनाने संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि आरोग्य विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नाही. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. जर नगरपालिकेने केमिकलयुक्त दूषित पाणी नदीपात्रामध्ये सोडणे बंद केले नाही, तसेच दूषित झालेल्या विहिरीची लवकरात लवकर स्वच्छता करून शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला नाही, तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन घेतले जाईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते संजय देशमुख, प्रमोद शिंदे, संतोष शिंदे, सुनील शिंदे, नानासाहेब कोटकर, भास्कर बांगर, सचिन शिंदे, अण्णासाहेब भवर यांनी दिला आहे.

पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविणार - डॉ. अभंग

खराडी-वाघापूर शिवारातील देवगावला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीत दूषित पाणी मिसळल्याने मासे मृत अवस्थेत आढळले आहेत. त्यामुळे हे पाणी पिण्यास अयोग्य आहे. विहिरीतील पाण्याचे नमुने बाटलीमध्ये भरून तपासणीसाठी घेतले आहे. ते पाणी घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. तोपर्यंत नागरिकांनी या पाण्याचा वापर करू नये, डॉ. ऋषिकेश अभंग, समुदाय वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र देवगाव.

# आदिती तटकरे यांची आमदार सत्यजीत तांबे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

## 'रक्षक दल' उपक्रमाचे राज्यभर विस्ताराचे संकेत?



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती ताई तटकरे यांनी संगमनेर येथील आमदार सत्यजीत तांबे यांच्या 'प्रभा' निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी पारनेर-नगर मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, माजी नगराध्यक्ष सौ. दुर्गा तांबे व डॉ. मैथिली तांबे उपस्थित होत्या.

भेटीदरम्यान संगमनेर शहरातील महिला सुरक्षेसाठी नगरपालिके तर्फे राबविण्यात येत असलेल्या 'रक्षक दल' उपक्रमाची आदिती तटकरे यांनी सविस्तर माहिती घेतली. या उपक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या सुरक्षेसाठी स्थानिक पातळीवर प्रभावी उपाययोजना करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर केल्याप्रमाणे संगमनेरमधील 'रक्षक दल' उपक्रमाचा आदर्श घेत राज्यभर अशा प्रकारचे उपक्रम राबविण्याचा सरकारचा मानस असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी माजी नगराध्यक्ष सौ. दुर्गा तांबे यांनी आदिती ताई तटकरे यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत केले. भेटीदरम्यान महिला सक्षमीकरण व सुरक्षिततेसंदर्भात विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

# आश्वी खुर्दमध्ये घरावर वीज कोसळली

आश्वी (युवावार्ता प्रतिनिधी)-



संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द परिसरात शुक्रवारी (दि. ३ एप्रिल) सायंकाळी विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला. याच दरम्यान सोनवणे वस्तीवरील एका घरावर वीज कोसळून मोठे नुकसान झाले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्रवरा बँकेचे सेवानिवृत्त शाखा व्यवस्थापक प्रकाश सोनवणे यांच्या घरावर शुक्रवारी सायंकाळी वीज पडल्याची घटना घडली. पावसाची सुरुवात झाल्यानंतर अचानक जोरदार कडकडाट होऊन वीज कोसळली. त्यामुळे घराच्या स्लॅबवर बसवलेला सोलर वॉटर जळून गेला. विजेचा तडाखा इतका तीव्र होता की सोलर सेटच्या काचेचे तुकडे परिसरात विखुरले गेले. तसेच इमारतीच्या स्लॅबलाही तडे गेले आहेत. विशेष म्हणजे, ज्या खोलीच्या वर वीज पडली त्या ठिकाणीच कुटुंबीय उपस्थित होते. घर स्लॅबचे असल्याने आम्ही बचावलो; पत्र्याचे घर असते तर मोठा अनर्थ झाला असता, अशी प्रतिक्रिया कुटुंबीयांनी व्यक्त केली गेल्या दोन दिवसांपासून आश्वी परिसरात दुपारनंतर विजांच्या कडकडाटासह पाऊस आणि जोरदार वारे सुरू आहेत. या अवकाळी पावसामुळे हाताशी आलेल्या गहू व इतर पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी परिसरातून जोर धरत आहे.

# संगमनेरमध्ये वादग्रस्त सोशल मीडियावरील पोस्ट प्रकरणी तक्रार

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सोशल मीडियावर छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह व वादग्रस्त पोस्ट केल्याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.



याबाबत ओंकार मनोज भालेराव (वय २७, रा. लक्ष्मीनगर, गुंजाळवाडी, ता. संगमनेर) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, ते विहिंप बजरंग दल संगमनेर प्रखंडाचे शहर संयोजक म्हणून कार्यरत आहेत. दिनांक ३ एप्रिल रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास त्यांना त्यांच्या मित्राने व्हॉट्सॲपवर एक स्क्रीन रेकॉर्डिंग व्हिडिओ पाठविला. या व्हिडिओमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर व त्यांचा साखळदंडात बांधलेला फोटो दाखविण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

सदर व्हिडिओ हा इन्स्टाग्रामवरील स्टोरी स्वरूपात claasy muzaaxx या अकाऊंटवरून पोस्ट करण्यात आला असून 313šhaniff या अकाऊंटने त्यास मेंशन केल्याचे दिसून आले. पुढील चौकशीत 313šhaniff या अकाऊंटधारकाने तक्रारदाराच्या मित्राला धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

तसेच, संबंधित अकाऊंटधारकाचे नाव हनिफ पठाण (रा. जोर्वे नाका, संगमनेर) असल्याची माहिती समोर आली असून त्याने इन्स्टाग्राम चॅटद्वारे एका व्यक्तीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. सध्या संबंधित इन्स्टाग्राम अकाऊंट डिॲक्टिव्हेट करण्यात आले असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी हनिफ पठाण याच्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी तक्रारदाराने पोलिसांकडे केली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# ४६ वर्षे समर्पणाचे, ४६ वर्षे भाजपचे

**संगमनेर (प्रतिनिधी)- भारतीय जनता पक्षाचा आज सोमवारी ४६ वर्धापनदिन देशभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. संगमनेर भाजपच्या वतीने पक्ष कार्यालयासमोर विविध मान्यवरांच्या उपस्थितीत व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते हा उत्सव साजरा करण्यात आला. तसेच बसस्थानकासमोर सरबत वाटप करून एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या.**



# १०० कोटींचा टप्पा पार !

## श्री यशोदेव पतसंस्थेची दमदार झेप

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -



येथील सर्व सामान्यांची पतसंस्था म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या श्री यशोदेव पतसंस्थेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात भक्कम कामगिरी करत १०० कोटींच्या ठेवींचा टप्पा पार केला आहे. संस्थेच्या या प्रगतीमुळे आर्थिक क्षेत्रात तिचे वेगळे स्थान निर्माण झाले आहे.

संस्थेचे संस्थापक प्रदीपभाई शाह यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली आणि चेअरमन सीए हर्षल गुंदेचा यांच्या कुशल नेतृत्वामुळे संस्थेची वाटचाल अधिक गतिमान झाली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने पारदर्शकता आणि आर्थिक शिस्त यांचा उत्कृष्ट मेळ साधत उल्लेखनीय प्रगती साधली आहे.

दि. ३१ मार्च २०२६ अखेर ठेवी १०१ कोटी ३० लाख रुपये इतक्या झाल्या असून, कर्ज वितरण ७७ कोटी २४ लाख रुपये इतके झाले आहे. संस्थेचा एकूण व्यवसाय १७८ कोटी ५४ लाख रुपये इतका झाला असून, हा वाढता आलेख संस्थेच्या यशाची साक्ष देणारा आहे.

याशिवाय संस्थेचा स्वनिधी १५ कोटी ८९ लाख रुपये, गुंतवणूक ४३ कोटी ७७ लाख रुपये आणि खेळते भांडवल १२४ कोटी ३५ लाख रुपये इतके झाले आहे. संस्थेने १ कोटी ७७ लाख रुपयांचा नफा मिळवत आर्थिक भक्कमपणा सिद्ध केला आहे. CD रेशो ६८% आणि नेट NPA ०% राखण्यात संस्थेला मिळालेले यश विशेष उल्लेखनीय मानले जात आहे.

या यशामागे व्हा. चेअरमन डॉ. अजित वखारीया, संचालक मंडळ, व्यवस्थापक व कर्मचारी वर्ग यांचे एकत्रित व नियोजनबद्ध प्रयत्न कारणीभूत ठरले आहेत. तसेच सभासद, ठेवीदार व ग्राहकांचा वाढता विश्वास हीच संस्थेची खरी ताकद असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीमुळे श्री यशोदेव पतसंस्था आज विश्वासार्हतेच्या शिखरावर पोहोचली असून, आगामी काळातही नाविन्यपूर्ण योजना राबवत सर्वसामान्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी संस्था कटिबद्ध राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# ज्ञानमाता विद्यालयाच्या ऋतुजा गायकवाडची यूपीएससी परीक्षेत बाजी

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-



जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर कोणत्याही संकटावर मात करता येते, हे ज्ञानमाता विद्यालयाची माजी विद्यार्थिनी ऋतुजा गायकवाड हिने सिद्ध करून दाखवले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करत ऋतुजाची जिल्हाधिकारी (आयएएस) पदावर निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण संगमनेर तालुक्यातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ऋतुजा अशोक गायकवाड हिने संगमनेर तालुक्यातील पहिली महिला आयएएस अधिकारी होण्याचा मान मिळवला आहे. ऋतुजाच्या निवडीची बातमी समजताच ज्ञानमाता विद्यालयाच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. आमच्या शाळेतील विद्यार्थिनी आज देशातील सर्वोच्च परीक्षा पास होऊन उच्च पदावर जात आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, अशा भावना शाळेच्या मुख्याध्यापकांनी व्यक्त केल्या. सोशल मीडियावरही ऋतुजाच्या यशाची चर्चा रंगली असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ती एक प्रेरणास्थान ठरली आहे.

ऋतुजाचे माध्यमिक शिक्षण इयत्ता ६ ते १० वी पर्यंत चे शिक्षण ज्ञानमाता विद्यालयात झाले. शालेय जीवनापासूनच ती हुशार आणि अभ्यासू मुलगी म्हणून ओळखली जात होती. प्रशासकीय सेवेत जाऊन समाजाची सेवा करण्याचे स्वप्न तिने उराशी बाळगले होते. राहुरी येथून बी.टेक पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तिने दिल्ली येथे राहून परीक्षेची तयारी सुरू केली. अनेक तासांचा सराव, अवांतर वाचन आणि आत्मविश्वासाच्या बळावर तिने हे यश संपादन केले आहे.

ऋतुजाच्या या यशाने ज्ञानमाता विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाचे श्रेय तिने आपल्या पालकांना आणि शिक्षकांना दिले आहे. तिने म्हटले की, माझ्या यशामध्ये ज्ञानमाता विद्यालयातील शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे. शिक्षकांनी दिलेली प्रेरणा, आत्मविश्वास व आणि पालकांनी दाखवलेला विश्वास यामुळेच मी इथपर्यंत पोहोचू शकले. प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्याला माझे प्राधान्य असेल. ज्ञानमाता विद्यालयामध्ये शालेय व्यवस्थापन व प्राचार्यांच्या वतीने ऋतुजा गायकवाड हिचा विशेष सन्मान करण्यात आला, व सामान्य परिस्थितीत जिद्दीने व सातत्यपूर्ण अभ्यासातून ऋतुजाने मिळविलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे, असे मत प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगिनी तळेकर यांनी केले. दरम्यान उपप्राचार्या अर्चना डोंगरे, ज्युनिअर कॉलेज इन्चार्ज शारदा नवले, माजी शिक्षक श्री के. डी. भोसले, पर्यवेक्षक फादर प्रशांत शहाराव व उपस्थित सर्व शिक्षक कर्मचारी बंधू भगिनींनी ऋतुजा गायकवाड हिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# संपादकीय...

पुण्यतिथीनिमित्त

## भारताचे एडिसन : डॉ. शंकर आबाजी भिसे

भारताचे एडिसन म्हणून ओळखले जाणारे थोर संशोधक डॉ. शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. स्वातंत्र्यपूर्व काळात, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि मर्यादित साधनसामग्रीमध्ये त्यांनी केलेले संशोधनकार्य आजही प्रेरणादायी ठरते. २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबई येथे त्यांचा जन्म एका सुशिक्षित कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांना संशोधनाची विलक्षण आवड होती. ज्या काळात भारतीयांना दुय्यम दर्जाचे नागरिक मानले जात होते, त्या काळात डॉ. भिसे यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर जगभरात नाव कमावले. त्यांच्या बालपणीची एक घटना त्यांच्या संशोधक वृत्तीचे उत्तम उदाहरण ठरते. एकदा साखर खरेदी करताना त्यांना व्यापाऱ्याने कमी वजनाची साखर दिली, हे त्यांच्या लक्षात आले. याबाबत त्यांनी विचारणा केली असता, माझ्या काट्यावर विश्वास नसेल तर आपोआप वजन करणारे यंत्र तयार कर, असे खोचक उत्तर व्यापाऱ्याने दिले. या आव्हानाला उत्तर देताना छोट्या शंकरांनी आत्मविश्वासाने एक दिवस असे यंत्र तयार करीन, असे सांगितले. पुढे त्यांनी खरोखरच स्वयंमापन यंत्राची निर्मिती करून हे स्वप्न साकार केले, ही गोष्ट त्यांच्या चिकाटीची साक्ष देते. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र तयार केले. १८९७ साली 'इन्व्हेंटर रिव्ह्यू अँड सायंटिफिक रेकॉर्ड' या मासिकाने स्वयंमापन यंत्राची आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित केली होती. डॉ. भिसे यांनी या स्पर्धेसाठी तयार केलेल्या आराखड्याला इंग्लंडमध्ये प्रथम क्रमांक मिळाला. विशेष म्हणजे, या स्पर्धेत युरोप व अमेरिकेतील नामांकित संशोधक सहभागी झाले होते. ही कामगिरी भारतीय बुद्धिमत्तेचा जागतिक स्तरावर झालेला गौरव होता. इंग्लंडमध्ये गेल्यानंतर त्यांनी मुद्रण क्षेत्रात अनेक महत्त्वाचे शोध लावले. त्या काळात प्रचलित असलेल्या यंत्रांचा सखोल अभ्यास करून त्यांनी 'भिसो टाईप' हे यंत्र विकसित केले. या यंत्राचे पेटंट त्यांनी इंग्लंड, अमेरिका, जर्मनी आणि फ्रान्समध्ये घेतले. त्यांच्या या संशोधनासाठी सर रतनजी टाटा यांनी आर्थिक सहकार्य दिले आणि १९१० साली 'टाटा-भिसे इन्व्हेन्शन' ही कंपनी लंडनमध्ये स्थापन झाली. जरी काही कारणांमुळे ही कंपनी १९१५ मध्ये बंद पडली, तरी त्यांच्या संशोधनाची दिशा थांबली नाही. पुढे त्यांनी 'गुणित मातृका' हे यंत्र तयार केले, जे एका मिनिटात सुमारे बाराशे अक्षरे छापू शकत होते. १९१६ मध्ये त्यांनी अमेरिकेत 'युनिव्हर्सल टाईप क्लस्टर' या यंत्राचे पेटंट घेतले. मुद्रण क्षेत्रातील त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. याशिवाय त्यांनी विद्युतशास्त्र, रसायनशास्त्र आणि औषधनिर्मिती क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले. डॉ. भिसे यांच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची मानवतावादी दृष्टी. १९१० साली ते आजारी असताना त्यांच्यावर उपचारासाठी वापरण्यात आलेल्या एका भारतीय औषधाने त्यांना लाभ झाला. त्यानंतर त्यांनी त्या औषधाचा अभ्यास करून 'बेसलीन' हे औषध तयार केले. हे औषध बाह्योपचारासाठी अत्यंत प्रभावी ठरले. पहिल्या महायुद्धात या औषधाचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला आणि अनेक सैनिकांचे प्राण वाचले. पुढे त्यांनी 'ऑटोमेडियन' हे औषध तयार केले, जे अंतर्गत सेवनासाठी उपयुक्त होते. त्यांच्या संशोधनाचा व्याप इतका मोठा होता की त्यांनी सुमारे दोनशेहून अधिक शोध लावले आणि चाळीसपेक्षा अधिक शोधांचे पेटंट मिळवले. त्यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त इंग्लंडमध्ये त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. याच काळात त्यांची भेट महान शास्त्रज्ञ थॉमस एडिसन यांच्याशी झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचे कौतुक केले, ही बाब त्यांच्या कार्याची जागतिक पातळीवरील दखल दर्शवते. डॉ. भिसे यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांची नैतिकता आणि मानवतेबद्दलची बांधिलकी. इंग्लंडमध्ये युद्धाच्या काळात त्यांना स्वयंचलित तोफा तयार करण्याची ऑफर देण्यात आली. त्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मोबदला देण्याची तयारी होती. मात्र, आपले संशोधन हे मानवाच्या कल्याणासाठी आहे, विनाशासाठी नाही, या ठाम भूमिकेमुळे त्यांनी ही ऑफर नाकारली. त्यांच्या या निर्णयातून त्यांचा उच्च विचार आणि मूल्यनिष्ठा स्पष्टपणे दिसून येते. ७ एप्रिल १९३५ रोजी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे या महान संशोधकाचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या संशोधनाचा प्रभाव कायम राहिला. आजच्या आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात त्यांच्या कार्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

# प्रभू येशूने पुनरुत्थानाद्वारे आपले देवत्व सिद्ध केले - फा. पाटेकर

## ईस्टर संडेनिमित्त तालुक्यातील चर्चेसमध्ये प्रार्थना उत्साहात

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

प्रभू येशू ख्रिस्ताने पुनरुत्थानाद्वारे आपले देवत्व सिद्ध करून अन्यायावर व अंधारावर विजय मिळवला, असे प्रतिपादन फा. फ्रान्सिस पाटेकर यांनी केले.

सेंट मेरी चर्चमध्ये ईस्टर संडे, प्रभू येशूच्या पुनरुत्थान दिनी भाविकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले, आज आम्हीही प्रभू येशूच्या बहुमूल्य प्रेरणादायी जीवनकार्यातून प्रेरणा घेऊन, आमच्या थंड पडलेल्या निष्क्रीय अशा आध्यात्मिक जीवनात संत पौलासारखी सुवार्ता प्रसाराची महान सेवा करून ख्रिस्ती जीवन जगायला हवे. ईस्टर संडेच्या दिवशी प्रभू येशू आत्मबलाने व विचाराने पुन्हा जिवंत झाला. त्यांची शिकवण संपूर्ण जगाला प्रेरणादायी आहे. आपण याच विचारांचा वारसा पुढे घेऊन प्रत्येकाला आदर व सन्मान दिला पाहिजे. ईस्टर संडेच्या या दिवसाच्या संदेशाचे मनापासून अनुकरण करणे ही काळाची गरज आहे.

या वेळी सेंट मेरी धर्मग्राम प्रमुख फा. जो. गायकवाड, फा. ओल्विन मिस्किटा, फा. जयसिंग, लाजारस केदारी, कैलास भोसले, लॉरेन्स गायकवाड, अनुप कदम, जया जाधव, सुरेखा त्रिभुवन, संगीता बारसे, अनिल भोसले, शशीभाऊ पगारे, प्रदीप भोसले, प्रभाकर दुशिंग आदींसह मोठ्या संख्येने ख्रिस्ती बांधव उपस्थित होते.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चणेगांवच्या विद्यार्थ्यांचे लक्षवेध परिक्षेत घवघवीत यश



कु. सायली खेमनर

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील चणेगांव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकत्याच घेण्यात आलेल्या लक्षवेध परिक्षेमध्ये इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी जिल्ह्यासह राज्यपातळीवर घवघवीत यश संपादन केलेले आहे. त्यात अनुक्रमे इयत्ता पहिली मध्ये कु. मिताली रविंद्र खेमनर (राज्यात १९ वी), कु. कृतिका सुनिल दिघे (राज्यात ३३ वी), तर चि. हर्षवर्धन संजय ढमक (राज्यात ३५ वा), तसेच इयत्ता दुसरी मध्ये कु. अपेक्षा मच्छिंद्र बिडगर (राज्यात २९ वी), कु. वेदिका गणेश पाटोळे (राज्यात ३७ वी), तर कु. वेदिका माधव खेमनर (राज्यात ४३ वी), इयत्ता तिसरी मध्ये कु. सायली रामेश्वर खेमनर (राज्यात २३ वी), चि. राम रोशन गुळवे (राज्यात ४१ वा), तर कु. राजनंदिनी शंकर शिंदे (राज्यात ५६ वी), इयत्ता चौथी मध्ये चि. समर्थ अनिल गुळवे (राज्यात ३४ वा), कु. अपूर्वा मच्छिंद्र बिडगर (राज्यात ३५ वी), तर कु. आदिती चांगदेव खेमनर (राज्यात ४८ वी), अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी आपले ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या शाळेचे नाव जिल्हा पातळीसह राज्यपातळीवर पोहचवण्याचे काम यामाध्यमातून केलेले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगिता शेलार, राजेंद्र जोशी, वाळिबा वाळेकर यांचेसह शाळाव्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले. ग्रामीण भागातील शाळेतील मुलेही आता स्पर्धा परिक्षांमध्ये मागे राहिलेले नाही, असे मत सदर शिक्षकांनी व्यक्त करून विद्यार्थांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सह्याद्री विद्यालयाचा हेरंब खाडेची नवोदय व सैनिकी स्कूल येथे निवड



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालयाचा इयत्ता पाचवी मधील विद्यार्थी हेरंब खाडे ह्याची नवोदय परीक्षा व सैनिकी स्कूलमध्ये निवड होऊन दुहेरी यशाचा झेंडा फडकविला. सह्याद्री विद्यालयामध्ये हेरंब खाडे याचा संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या उपस्थितीमध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक एस. एम. खेमनर उपस्थित होते.

हेरंबने मेहनतीच्या जोरावर हे दुहेरी यश संपादन केले आहे. हेरंबचे वडिल पोलीस कॉन्स्टेबल; तर आई प्राथमिक शिक्षिका आहे. त्याचे अभ्यासाची चिकाटी व वर्गशिक्षिका आहेर उर्मिला यांचे मार्गदर्शन लाभले. हेरंबने नवोदय परीक्षा निवडीची विद्यालयाची परंपरा कायम राहिली.

यावेळी बोलताना माजी आमदार डॉ. तांबे म्हणाले की, सह्याद्री विद्यालयामध्ये सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांमधील गुण हेरले पाहिजे. त्याला ज्या क्षेत्रामध्ये आवड आहे त्या क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. पालकांनी आपल्या पाल्यांसाठी थोडा वेळ द्या. पाल्यांच्या आवडीनिवडी तपासा. मुलेही पालकांची भविष्यात मोठी शिदोरी असून, मुलांच्या जडणघडणीत शिक्षक आणि पालकांचा अत्यंत महत्त्वाचा वाटा असल्याचे ते म्हणाले. यावेळी त्यांनी हेरंब खाडे यांची कौतुक केले.

या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक माजी मंत्री बाळासाहेब थोरात, संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार सुधीर तांबे, सेक्रेटरी सुमंत कोल्हे, आमदार सत्यजीत तांबे, माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात, संगमनेर नगरपालिकाच्या नगराध्यक्षा मैथीली तांबे, खजिदार ॲड. ज्ञानेश्वर सांगळे, संचालक प्रा. बाबा खरात, मुख्याध्यापक एस. एम. खेमनर, उपमुख्याध्यापिका सुरेखा दिघे, परिवेक्षिका संगीता रणशूर, पर्यवेक्षक किशोर देशमुख व अण्णासाहेब दिघे, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर सेवकांनी हेरंबचे अभिनंदन करून त्याला पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.


**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7030125701

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०२ जागा
टॅली कोर्स
ड्रायव्हर - ३ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड संगमनेर
9370071777
9822791484

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
MANNABEGUM MUNSIBHAI SAYYAD
NEW NAME AS
MANNA NAZEER PATHAN
ADD – KOLHEWADI ROAD, MADINA NAGAR SANGAMNER, TAL - SANGAMNER DIST- AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
HABIBKHAN MAHEMUDKHAN ATTAR
NEW NAME AS
HABIB MAHEMUD ATTAR
ADD – BAJAR PETH, TELI KHUNT, SANGAMNER, TAL - SANGAMNER DIST- AHMEDNAGAR

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी ॲग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला, वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन
कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर
सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ १२ ते ९
9511238422

**पाहिजेत**
सेल्समन - १ जागा
सर्विस प्रोव्हायडर हेल्पर ०१ जागा
अकाउंटंट - ०१ जागा
कामाचे ठिकाण : संगमनेर
M/s. Pawar and Sons
7498621873

**हेल्पर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**बंगला भाड्याने पाहिजे**
2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर, ०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या, व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी






**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५









MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

# अकोले खरेदी विक्री संघाचे संचालक नानासाहेब नाईकवाडी यांचे निधन

## चिंचोली फाट्याजवळ अज्ञात वाहनाची धडक

अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-
अकोले तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक व प्रगतीशील शेतकरी (वय ५२, रा. नाईकवाडी नगर, अकोले) यांचे आज सकाळी अज्ञात वाहनाच्या धडकेत अपघाती निधन झाले. कोल्हार-नगर रस्त्यावरील चिंचोली फाटा येथे हा अपघात झाला. नानासाहेब मारुती नाईकवाडी ऊर्फ नाना.



स्पष्ट वक्ते आणि मिश्कील स्वभावामुळे 'नाना' या नावाने ते सर्वदूर परिचित होते. त्यांचा मोठा मित्रपरिवार असून, त्यांच्या अपघाती निधनामुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, तीन बहिणी, पुतणे आणि पुतणी असा मोठा परिवार आहे. ते अगस्ती कारखान्याचे संचालक बाळासाहेब नाईकवाडी यांचे बंधू, तर प्रगतीशील शेतकरी स्वप्निल व सरकारी कंत्राटदार अनिकेत नाईकवाडी यांचे वडील होते. तसेच, अकोले नगरपंचायतीचे नगरसेवक इंजिनिअर प्रदीप नाईकवाडी आणि काँग्रेसचे युवक तालुका अध्यक्ष अमोल नाईकवाडी यांचे ते चुलते होते. संगमनेर अकोले तालुका स्नेहवर्धक संघटना मुंबई सदस्य राजेश माधव नाईकवाडी यांचे ते चुलते होते. त्यांच्यावर अकोले येथील अमरधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खांडगाव येथील बीएसएफ जवान दिलीप ढगे यांना वीरमरण

खांडगाव
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर तालुक्यातील खांडगाव येथील वीर जवान दिलीप भाऊसाहेब ढगे (वय ४१) यांचे कर्तव्यावर असताना आजारपणामुळे निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.



दिलीप ढगे हे मागील वीस वर्षांपासून बीएसएफ (सीमा सुरक्षा दल) मार्फत देशसेवेत कार्यरत होते. कर्तव्य बजावत असताना त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला होता. पुढे हा आजार गंभीर बनला. कुटुंबीयांनी त्यांच्या उपचारासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

अत्यंत शांत, संयमी व सुस्वभावी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या अकाली निधनामुळे ढगे परिवारासह खांडगाव ग्रामस्थ व नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई-वडील व भाऊ असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेला हजारो नागरिकांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. लष्कराकडून मानवंदना देऊन शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी एकवीरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात, सामाजिक कार्यकर्त्या सौ. नीलमताई खताळ, दूध संघाचे संचालक रमेशभाऊ गुंजाळ, ॲड. मधुकर गुंजाळ, सोमनाथ गुंजाळ, सरपंच ॲड. विकास गुंजाळ, माजी सैनिक कल्याण समितीचे प्रकाश कोटकर, बबन कोकणे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने वीर जवान दिलीप ढगे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# निमगाव भोजापूर येथे दोघा बोगस 'मुन्नाभाई' डॉक्टरांचा पर्दाफाश

## पोलिसात गुन्हा दाखल

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर तालुक्यातील निमगाव भोजापूर येथे कुठलीही वैद्यकीय पदवी नसताना बोगस पद्धतीने दवाखाना चालवून रुग्णांवर उपचार करणाऱ्या दोन 'मुन्नाभाई' डॉक्टरांचा आरोग्य विभागाने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणामुळे तालुक्यातील वैद्यकीय क्षेत्रात फार मोठी खळबळ उडाली आहे.

संगमनेर तालुक्यातील, निमगाव भोजापूर येथील शैलेश किसनराव कडलग आणि प्रवीण गंगाधर कवडे या दोघा बोगस मुन्नाभाईकडे कोणतीही अधिकृत वैद्यकीय पदवी नसताना साईलीला रिहॅबिलिटेशन सेंटरच्या नावाखाली रुग्णांवर उपचार करत होते. याबाबतची गुप्त माहिती एका खबऱ्यामार्फत संगमनेर पंचायत समितीचे प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कामेश टावरे यांना मिळाली. त्यांनी स्वतः पथकासह निमगाव भोजापूर येथे जाऊन छापा टाकला. असता बोगस मुन्नाभाई शैलेश कडलग हा रुग्णांवर उपचार करत असताना रंगेहात पकडण्यात आला.

तपासणीदरम्यान दवाखान्यात एक्सपायर औषधे, ओपीडी व आयपीडी रजिस्टर, प्रिस्क्रिप्शन पॅड तसेच एक रुग्ण ॲडमिट केलेल्या अवस्थेमध्ये आढळून आला. नंतर वैद्यकीय पथकाने कडलग याच्या घराची कसून तपासणी केली असता विविध १७ कंपन्यांची औषधेही मिळून आली. ते सर्व वैद्यकीय साहित्य पथकाने जप्त केले. आरोग्य अधिकाऱ्यांनी कडलग यांच्याकडे वैद्यकीय पदवीबाबत विचारणा केली असता, त्याच्याकडे महाराष्ट्र काउन्सिल ऑफ ॲक्युपंक्चरची अपुरी व संशयास्पद कागदपत्रे मिळून आली. मात्र, रुग्णांवर उपचार कोण करत होते, याबाबत त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही.



प्रत्यक्ष पाहणीच्या दरम्यान दवाखान्यातील इतर व्यक्ती रुग्णांवर उपचार करत असल्याचेही निदर्शनास आले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष दवाखान्यातील औषधांची तपासणी करून ती जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी संगमनेर तालुका पोलिसात डॉ. कामेश टावरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही बोगस मुन्नाभाईंच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

रुग्णांनी कुठल्याही आजारावरील उपचार घेण्यासाठी नेहमी अधिकृत व नोंदणीकृत डॉक्टरांकडेच जावे. कोणतीही वैद्यकीय पदवी किंवा नोंदणी नसलेल्या बोगस डॉक्टरांकडून उपचार घेणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे अशा बोगस डॉक्टरांपासून सावध राहावे,
डॉ. कामेश टावरे
प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी
पंचायत समिती, संगमनेर

# तमाशा कलावंतांवर हल्ला करणाऱ्यांना कठोर शिक्षा करा - भालेराव

## हिवरगाव पावसा येथे कला सम्राज्ञी पवळा कला मंचाने केला निषेध

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर तालुक्यातील पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील वरुडी फाटा येथे तमाशा कलावंतांच्या वाहनाला एका वाहनचालकाने कट मारत, इतरांना बोलावून घेत, कलावंतांना बेदम मारहाण केली. या घटनेत महिला कलावंतांशी असभ्य वर्तन करण्यात आल्याची धक्कादायक घटना बुधवारी घडली आहे. राष्ट्रपती सुवर्णपदक विजेत्या दिवंगत विठाबाई भाऊ नारायणगावकर यांच्या तमाशा फडातील कलावंतावरील हल्ल्याचा तीव्र निषेध करत, गुन्हेगारांवर कठोर दंडात्मक कारवाईचे मागणी करण्यात आली आहे. कलावंतांवरील हल्ला म्हणजे महाराष्ट्राच्या लोक संस्कृतीवर झालेला हल्ला आहे. सदर घटनेचा सखोल तपास करून, गुन्हेगारांना दंडात्मक शिक्षा न झाल्यास, तमाशा व लोक कलावंत संघटनांमार्फत राज्यभरात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कला सम्राज्ञी पवळा कला मंचाचे अध्यक्ष तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष उपाध्यक्ष श्रीकांत भालेराव यांनी दिला.

संगमनेर तालुका कलावंतांची जन्मभूमी म्हणून ओळखला जातो. पुरोगामी विचाराच्या तालुक्यामध्ये कलावंतांवर झालेला हल्ल्याचा कला सम्राज्ञी पवळा कला मंच आणि हिवरगाव पावसा ग्रामस्थांनी निषेध घटनेचा केला. आद्यनृत्यांगणा पवळा भालेराव हिवरगावकर यांचे पणतू नितीनचंद्र भालेराव, सरपंच सुभाष गडाख, भाजपाचे काशिनाथ पावसे, शिवसेना तालुका प्रमुख भीमाशंकर पावसे, वृक्षमित्र गणपत पावसे, ज्येष्ठ संपादक यादवराव पावसे, सरपंच सेवा संघाचे नेते बाबासाहेब पावसे, भाजपाचे तालुका सरचिटणीस गणेश दवंगे, प्रा. बाबुराव पावसे, केशव दवंगे, हरिश्चंद्र भालेराव यांनी एकत्र येत घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

राष्ट्रपती पदक विजेत्या विठाबाई नारायणगावकर यांच्या तमाशातील कलावंतांवर झालेल्या निंदनीय हल्ल्याच्या बातमी मिळताच, कला सम्राज्ञी पवळा कला मंचाचे अध्यक्ष श्रीकांत भालेराव यांनी घारगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात यांना फोनवरून संपर्क केला. घटनेतील गुन्हेगारांना कठोर शासन करण्याचे मागणी केली. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात यांनी चार गुन्हेगारांना पकडण्यात आल्याचे माहिती दिली. गुन्हेगारांवर गंभीर दुखापत, मारहाण, महिला कलावंतांना मारहाण तसेच रोख रक्कम चोरी, विविध कलमा अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे. घटनेतील इतर आरोपींचा शोध घेतला जात आहे, तसेच दोषींना कठोर शासन केले जाईल आणि कलावंतांना न्याय देण्याचे आश्वासन घारगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक थोरात यांनी दिले.

# खंडोबा देवस्थान 'क' वर्ग समाविष्ट करण्यासाठी प्रयत्नशील - आ. खताळ

## सावरगाव घुले येथे यात्रोत्सवानिमित्त आ. खताळ यांनी दिली भेट

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील सावरगाव घुले येथील खंडोबा देवस्थान हे परिसरातील भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान असून, या देवस्थानाचा 'क' वर्गात समावेश होणे आवश्यक आहे. यासाठी येणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये पाठपुरावा केला जाईल, असा विश्वास आ. अमोल खताळ यांनी सावरगाव घुलेच्या ग्रामस्थांना दिला.

सावरगाव घुले येथील खंडोबा देवस्थानच्या यात्रोत्सवानिमित्त आ. खताळ यांनी भेट देत महाआरती केली. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. कार्यक्रमास देवस्थानचे अध्यक्ष सिताराम



घुले, सचिव गोरक्षनाथ मदने, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत घुले, उपसरपंच नामदेव घुले, व्यापारी अमित राठी, सोसायटीचे अध्यक्ष संतोष घुले, भानुदास बो-हाडे, पत्रकार बाबासाहेब कडू, शरद घुले, सचिन घुले, बाळासाहेब घुले, बन्सी मदने यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार खताळ यांच्या हस्ते बैलगाडा शर्यतीत क्रमांक मिळविल्याबद्दल मधुकर घुले यांचा सन्मानचिन्ह व श्रीखळ देऊन सन्मान करण्यात आला.

आमदार खताळ म्हणाले की, या देवस्थानाचा 'क' वर्गात समावेश या पूर्वीच व्हायला हवा होता. मात्र वन विभागाच्या काही तांत्रिक अडचणींमुळे हा प्रस्ताव प्रलंबित राहिला. आता या अडचणी दूर करून, संबंधित सर्व विभागांशी समन्वय साधत देवस्थानाला 'क' वर्गाचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील. अकलापूर आणि सावरगाव घुले या भागात बैलगाडा शर्यतीची परंपरा सर्वप्रथम सुरू झाली असून, आजही ती जतन केली जात आहे, ही अभिमानाची बाब आहे. गावात 'टँकरमुक्त' झाल्याचा फलक पाहून समाधान वाटले. गेल्या सव्वावर्षाच्या कार्यकाळात प्रत्येक गाव, वाडी-वस्तीपर्यंत पोहोचून नागरिकांच्या समस्या जाणून घेत, त्यांचे निराकरण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत, असे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

राजस्थान राज्याने पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास साधला आहे. त्याच धर्तीवर संगमनेर तालुक्यातही पर्यटनवृद्धीस मोठी संधी उपलब्ध आहे. सावरगाव घुलेसह पठार भागातील धार्मिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक स्थळांचा नियोजनबद्ध विकास केल्यास या भागाला नवे आर्थिक बळ मिळू शकते. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि गावांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. त्यामुळे देवस्थानांचा विकास, पायाभूत सुविधा आणि पर्यटनदृष्ट्या आवश्यक सोयी-सुविधा उभारण्यावर विशेष भर दिला जाणार आहे,
श्री अमोल खताळ
आमदार, संगमनेर विधानसभा.

# काँग्रेसचे संघटन सृजन...

पान नं. ०१ वरुन- तर खासदार शिवाजीराव काळगे म्हणाले की, लातूर आणि संगमनेरचे प्रेम महाराष्ट्राने पाहिले आहे लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी पालकमंत्री म्हणून लातूरमध्ये केलेले काम लातूरकर कधीही विसरणार नाही. तर जिल्हाध्यक्ष सचिन गुजर म्हणाले की अहिल्यानगर जिल्हा हा काँग्रेसच्या विचारांचा राहिला आहे. येथील अनेक नेत्यांनी सहकार शिक्षण संस्थांमधून नेतृत्व केले अनेक लोक मोठे झाले. मात्र काँग्रेस पक्ष अडचणीत आल्यावर हे लोक काँग्रेसला सोडून गेले. अशा अडचणीच्या काळातही लोकनेते बाळासाहेब थोरात हे कायम काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिली आहे. हा आदर्श नवीन पिढी पुढे असल्याचे ते म्हणाल तर डॉ जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, काँग्रेसचा विचार हा शाश्वत विचार असून देश उभा करण्यामध्ये काँग्रेसचे मोठे योगदान आहे .छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा या मातीला असून येथे जातीपातीचे राजकारण कुणालाही मान्य नाही. महाराजांचे मावळे हे कुण्या एका जातीचे नव्हते. हे सर्व धर्माचे होते. शेतकरी ,रयतेसाठी आणि मानवता धर्मासाठी हा महाराष्ट्र कायम पुढे राहिला असून सर्वांनी काँग्रेसच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी सौ दुर्गाताई तांबे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संपतराव डोंगरे, लताताई डांगे,राजू पठाण, विजय जाधव, सोन्याबापु वाकचौरे, कल्याण पिसाळ, शब्बीर भाई, अभिजीत लुनिया, राजेंद्र निर्मळ, ज्ञानेश्वर झडे, सचिन कोते, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ जयश्रीताई थोरात यांनी केले. तर शिर्डी काँग्रेसचे अध्यक्ष सचिन चौगुले यांनी आभार मानले यावेळी संगमनेर शहर व तालुका व लगतच्या तालुक्यांमधील काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संगमनेरमध्ये मालपाणी उद्योग समूहाचा सामुदायिक विवाह सोहळा!

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेरमध्ये १९ एप्रिल रोजी रविवारी अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर सायंकाळी साडेचार वाजता मालपाणी उद्योग समूहाच्या वतीने मालपाणी लॉन्स येथे भव्य सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे गरजवंत, मध्यमवर्गीय यांच्यासह अनेक उच्चशिक्षित वधू-वर, असे एकूण या सोहळ्यात ४१ जोडपी विवाहबद्ध होऊन हजारोंच्या साक्षीने आपल्या वैवाहिक जीवनाचा श्रीगणेशा करणार आहेत. या दाम्पत्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशीर्वाद देण्यासाठी सर्व संगमनेरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मालपाणी उद्योग समूहाचे चेअरमन राजेश मालपाणी यांनी केले आहे. या सोहळ्यात विवाहबद्ध होण्यासाठी सुरु झालेल्या नावनोंदणीला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. मालपाणी परिवाराच्या वतीने सुरु करण्यात आलेला हा लोकहिताचा उपक्रम जनतेच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने तिसाव्या वर्षाकडे वाटचाल करीत आहे. सर्वधर्मीय समाजाला वरदान ठरलेल्या या सोहळ्याला २९ वर्षांची परंपरा आहे. आजवर १६०० हून अधिक परिवार या सोहळ्यामुळे परस्परांशी नात्यात जोडले गेले आहेत. सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून समूह वर्षनुवर्षे हा उपक्रम राबवीत आहे. केवळ एक रुपयाच्या नाममात्र मोबदल्यात होणारे विवाह राज्यात सर्वत्र कौतुकाचा विषय ठरले आहेत. या सोहळ्यात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन आणि बौद्ध अशा सर्वधर्मीय वधू-वरांचे विवाह त्या त्या धार्मिक प्रथेनुसार लावण्यात येतात. अशा प्रकारे ही सर्व जोडपी आपल्या सहजीवनाची सुरुवात विशाल जनसमुदायाच्या साक्षीने करणार आहेत.

मालपाणी उद्योग समूहाचे अध्वर्यू स्वर्गीय ओंकारनाथजी व स्वर्गीय माधवलालजी मालपाणी यांना २९ वर्षांपूर्वी, १९९७ साली, ही संकल्पना सुचली. विवाह समारंभांवर होणारी उधळपट्टी, त्यामुळे मुलीच्या परिवारांवर होणारा कर्जाचा बोजा, या सर्व बाबी लक्षात घेऊन या सोहळ्याची आखणी करण्यात आली. पहिल्या वर्षापासून आजवर प्रत्येक वर्षी या सोहळ्याला मिळणारा प्रतिसाद वाढत चालला आहे. सर्व समाजाने ही संकल्पना चांगलीच उचलून धरली आहे, असे आजवरच्या अनुभवावरून दिसून आले आहे. त्यामुळे सोहळ्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. संगमनेरचे वैशिष्ट्य म्हणून हा मालपाणी पॅटर्न' अनेक परिवारांना हवाहवासा वाटू लागला आहे. त्यापाठीमागे या सोहळ्याच्या आयोजनातील नीटनेटकेपणा हे आहे. या सोहळ्यासाठी कोणत्याही जाती धर्माचे बंधन नाही. कायद्याने सज्ञान असलेले वधू-वर आपली नावे यामध्ये नोंदवू शकतात. हिंदू, मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन अशा सर्वधर्मीय वधू-वरांचे विवाह त्या त्या धार्मिक प्रथेनुसार लावण्यात येतात.

सजविलेला सुसज्ज मंडप, वधूवर निवास व्यवस्था, भोजन सुविधा, सवाद्य मिरवणूक, हार-तुरे, सस्नेह भेट दिले जाणारे संसारोपयोगी साहित्य, वधू-वरांचे खास विवाहासाठी बनविण्यात आलेले पोषाख, मुंडावळ्या, अक्षता, पुरोहित वृंदाकडून मंत्रोच्चार तसेच मंगलाष्टके आणि विवाहानंतर अग्नीच्या साक्षीने होणारी सप्तपदी, यानुसार हिंदू विवाह संपन्न होतात. तर बौद्ध, मुस्लीम, ख्रिश्चन यांचे विवाह त्यांच्या धर्मगुरूंच्या उपस्थितीत धार्मिक रीतीरिवाजानुसार पार पडतात. वधू-वरांकडील वऱ्हाडीच्या भोजनाची व्यवस्था केली जाते.

प्रत्येक दाम्पत्यास मालपाणी समूहाच्या वतीने आहेर म्हणून स्टील कपाट, भांडी, रॅक, असे सुमारे तीस हजारांचे संसारोपयोगी साहित्य भेट म्हणून देण्यात येते. वधू-वरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी समाजाच्या सर्व स्तरातील सुमारे पंधरा ते वीस हजारांचा जनसमुदाय या कार्यक्रमाचा साक्षीदार असतो. माननीय मंत्रीगण, खासदार, आमदार, विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, अशी समाजाच्या सर्व स्तरातील माणसे उपस्थित असतात. संसाराची सुरुवात करतानाच पर्यावरण रक्षणाची जबाबदारी जोडप्याने घ्यावी, यासाठी प्रत्येक जोडप्यास एक रोप जोपासण्यासाठी भेट दिले जाते. वऱ्हाडी मंडळींच्या मनोरंजनासाठी वाद्यवृंदाची खास व्यवस्था केली जाते. सेल्फी काढण्यासाठी सुंदर सजावट असलेली विशेष व्यवस्था केली जाते.

स्वागत कक्ष, चौकशी, निवास व्यवस्था, स्टेज व्यवस्था, सजावट, भोजन, वाढप, वीज व्यवस्था, पाणी व्यवस्था, स्वच्छता, भेटवस्तू, मिरवणूक, सुरक्षा, फोटो प्रसिद्धी, बैठक, सत्कार समिती, अशा सुमारे पंचवीस समित्या कार्यरत असतात. उद्योग समूहातील कर्मचारी आणि कामगार प्रतिनिधी मिळून या नियोजनाची जबाबदारी ज्येष्ठ व्यवस्थापक रमेश घोलप यांच्या नेतृत्वाखाली उत्कृष्ट समन्वय राखून समर्थपणे सांभाळतात. उद्योग समूहाचे चेअरमन राजेश मालपाणी यांच्यासह संचालक सर्वश्री राजेश, डॉ. संजय, मनीष, गिरीश, आशीष, जय, यश, हर्षवर्धन, यांच्यासह मालपाणी परिवारातील श्रीमती ललितादेवी, श्रीमती सुवर्णाकाकी, सौ. संगीता, सौ. अनुराधा, सौ. रचना, सौ. सुनिता, सौ. दीप्ती, सौ. अनिष्का, सौ. श्रेया, सौ. इशिता आदी महिला सदस्य देखील उपस्थित राहून हा सोहळा यशस्वी करण्यास जातीने लक्ष घालतात. सामाजिक ऋण फेडण्यासाठी हा उपक्रम गेली २९ वर्षे अव्याहत सुरु असलेला हा उपक्रम राज्यात सर्वत्र कौतुकाचा विषय ठरला आहे.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................. 05
सेल्सगर्ल.................. 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........................ 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# रोटरी क्लबने फुलविला दिव्यांग बांधवांच्या जीवनात आनंद



## १६२ दिव्यांगांची तपासणी १०४ लाभार्थी निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- रोटरी क्लब ऑफ संगमनेर, रत्नानिधी फाऊंडेशन, मुंबई आणि रियांश मल्टिट्रेड लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधव-भगिनींसाठी आयोजित करण्यात आलेला 'जयपूर फूट कॅम्प' हा सामाजिक उपक्रम दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटल येथे दिनांक १ व २ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात पार पडला.

या दोन दिवसीय कॅम्पमध्ये एकूण १६२ दिव्यांगांची मोफत तपासणी व मोजमाप करण्यात आले. त्यापैकी १०४ गरजू लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यांना लवकरच ११८ जयपूर फूट, कृत्रिम हात तसेच आवश्यकतेनुसार कुबड्यांचे विनामूल्य वितरण करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी रत्नानिधी फाऊंडेशन, मुंबईचे मनोज चव्हाण व त्यांची टीम, रियांश मल्टिट्रेड लिमिटेडचे प्रमुख मधुकरजी जाधव, संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी दयानंदजी गोरे, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सहाय्यक प्रांतपाल रो. अमोल वैद्य, ओम मयूर ज्वेलर्सचे संचालक रो. महेश मयूर तसेच लाहोटी असोसिएट्सचे संचालक गणेशजी लाहोटी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे अध्यक्ष रो. विश्वनाथ मालाणी, सचिव रो. सौरभ म्हाळस, उपाध्यक्ष रो. महेश वाकचौरे, खजिनदार रो. संकेत काजळे, प्रकल्प समन्वयक रो. अजित काकडे, प्रकल्पप्रमुख रो. आनंद हासे, रो. महेश ढोले, रो. डॉ. प्रमोद राजुस्कर, रो. डॉ. सुजय कानवडे, रो. डॉ. किशोर पोखरकर यांच्यासह अनेक डॉक्टर, पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. तसेच रोटरी सदस्य, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते आणि दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या उपक्रमाला संगमनेर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. मैथिलीताई तांबे, इतर नगरसेवक तसेच रोटरी सेवागौरव पुरस्काराचे मानकरी चं. का. देशमुख सर, सिद्धार्थ तांगडकर यांसह विविध मान्यवरांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या सामाजिक उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना नवसंजीवनी मिळणार असून त्यांच्या जीवनात स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला होणार आहे. रोटरी क्लब ऑफ संगमनेर व सहभागी संस्थांच्या या सेवाभावी कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# संग्राम पतसंस्थेची आर्थिक भरारी

## ठेवी, नफ्यात लक्षणीय वाढ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक विभाग कार्यक्षेत्र असणारी व संगमनेर तालुक्यात अग्रगण्य असणाऱ्या संग्राम पतसंस्थेस सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात ३ कोटी ४१ लाख रु. इतका नफा झाला आहे अशी माहिती संस्थेचे चेअरमन राणीप्रसाद मुंदडा यांनी दिली. हा नफा सर्व तरतुदी वजा जाता आहे असेही त्यांनी यावेळी नमूद केले. ठेवीदार, कर्जदार व हितचिंतकांच्या विश्वासामुळे संस्था असे लक्ष्य साध्य करू शकली अशी भावना यावेळी चेअरमन यांनी व्यक्त केली तसेच त्याबद्दल सर्व ठेवीदार, कर्जदार व हितचिंतकांचे आभार व्यक्त केले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या शिस्तीत, मा. ना. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुधीर तांबे, मा. नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे व मा. आ. सत्यजीतदादा तांबे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने आपला आलेख उंचावत ठेवला आहे. सालाबादप्रमाणे यंदाही संस्थेने परंपरा कायम ठेवत आपल्या कामगिरीचा व विश्वासार्हतेचा ठसा उमटविला.

सहकार क्षेत्रात विश्वासार्ह नाव म्हणून ओळखली जाणारी संग्राम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेर यांनी चालू आर्थिक वर्षात सर्वांगीण प्रगती साधत आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. सक्षम व्यवस्थापन, पारदर्शक कारभार आणि सभासद-केंद्रित सेवा यामुळे संस्थेने प्रगतीचा नवा उच्चांक गाठला आहे.

संस्थेने यावर्षी एकूण ३ कोटी ४१ लाखांचा निव्वळ नफा मिळवला असून आर्थिक शिस्त आणि योग्य नियोजनाचे हे फलित मानले जात आहे. संस्थेचे वसूल भाग भांडवल. १ कोटी ८७ लाखांवर पोहोचले असून नवीन सभासदांची नोंदणीही लक्षणीय वाढली आहे.

गुंतवणूकदारांचा वाढता विश्वास लक्षात घेता, संस्थेकडे एकूण . १५६ कोटीं ३५ लाख ठेवी जमा झाल्या आहेत. सुरक्षितता आणि आकर्षक व्याजदरामुळे ठेवीदारांचा ओढा सातत्याने वाढत आहे. तसेच संस्थेने विविध ठेवी योजनांद्वारे नागरिकांना दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य मिळवून दिले आहे. कर्ज वितरणाच्या बाबतीत संस्थेने उत्कृष्ट कामगिरी करत. १३३ कोटीं १ लाख कर्ज वाटप केले आहे. संस्थेचे स्वनिधी २७ कोटीं ६८ लाख तसेच एकूण गुंतवणूक ५५ कोटीं ४७ लाख असून एकत्रित व्यवसाय २८९ कोटीं ३६ लाख झाला आहेत. त्यामध्ये सोनेतारण कर्ज मोठ्या प्रमाणावर वाढले असून संस्थेवर विश्वास वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आर्थिक गरजा जलद आणि सुलभ पद्धतीने पूर्ण होत आहेत अशी माहिती संस्थेचे व्हा. चेअरमन इंजि. विजय गिरी यांनी दिली.

विशेष म्हणजे, संस्थेने कर्जवाटप करताना पारदर्शकता आणि नियमबद्धता कायम ठेवत एनपीए (थकीत कर्ज) नियंत्रणात ठेवले आहे, ज्यामुळे संस्थेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम झाली आहे. आगामी काळात अधिक नावीन्यपूर्ण योजना, शाखा विस्तार आणि ग्राहकाभिमुख सेवा देऊन सहकार क्षेत्रात आघाडी कायम ठेवण्याचा निर्धार संस्थेने व्यक्त केला असून लवकरच संस्थेचे मुख्य कार्यालय स्वमालकीच्या भव्य इमारतीत स्थलांतर होणार आहे. ग्राहक सेवा अधिक सक्षम करण्यासाठी डिजिटल सेवा, जलद व्यवहार प्रणाली आणि सभासदांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. संस्थेच्या वार्षिक आढावा सभे प्रसंगी मा. संचालक मंडळ डॉ. नाजिमुददीन शेख,विलास दिघे, डॉ. माणिकराव शेवाळे, सुर्यकांत शिंदे, नानासाहेब वर्पे, दत्तात्रय आरोटे, ॲड. प्रशांत गुंजाळ, श्रीकांत कोकणे, सुदिप वाकळे, डॉ. सुचित गांधी, उमेश बोटकर, सोमेश्वर दिवटे, सुलभाताई शिवाजीराव दिघे, सौ. सुनंदाताई मच्छिंद्र दिघे, अनिल सातपुते, सी. ए. अमित कलंत्री व प्रकाश गुंजाळ अधिकारी व कर्मचारी यांचे समन्वयित प्रयत्न आणि सभासदांचा विश्वास हे मुख्य कारण असल्याचे मत व्यवस्थापक उमेश शिंदे यांनी व्यक्त केले.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शून्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करू नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

## एरंडे फाईल...

पान १ वरून -

पोलिसांकडून संबंधित हॉटेल्सची माहिती गोळा करून सीसीटीव्ही फुटेज आणि रेकॉर्ड तपासले जात आहेत. मुख्य आरोपी रवींद्र एरंडे याची पोलिस कोठडी सोमवारी संपत असून त्याला दुपारी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या गुन्ह्याची व्याप्ती लक्षात घेता आणि आणखी पुरावे मिळवण्यासाठी पोलिस त्याच्या कोठडीत वाढ करण्याची मागणी करण्याची शक्यता आहे. या प्रकरणात एरंडे एकटाच कार्यरत होता की त्याला इतर सहकारीही होते, याचा तपास सध्या सुरू आहे. डिजिटल पुरावे आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी करून संपूर्ण रॅकेट उघड करण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे.

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

## युवा न्यूज डिजिटल वाचक प्रतिसाद

युवा न्यूज डिजिटल क्षेत्रात कार्यरत असताना अनेक व्हिडिओंना एक लाखाच्या पुढून व्ह्यूज मिळालेले आहेत. अत्यंत गंभीर घटनांच्या संदर्भातील व्हिडिओंना वाचकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असताना दैनिक युवावार्ताद्वारे डिजिटल युवा प्रतिसाद माहिती वाचकांना देत आहोत. वाचकांनी आपले अभिप्राय कळविण्याची विनंती.

अशोक खरातच्या विकृत बुवाबाजीनंतर अशा प्रकारच्या गुन्ह्यात नाशिकच्या रविंद्र गणपत एरंडे यास अटक झाली आहे. त्यासंदर्भातील व्हिडिओ वाचकांच्या माहितीसाठी युवा न्यूज द्वारे QR कोड देत आहोत.

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग • किडनी विकार
• मधुमेह व हृदयरोग • मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• दमा व श्वसनाचे विकार • सर्पदंश व विषबाधा
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार • बालरोग चिकित्सा विभाग
• जनरल सर्जरी • प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया • संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रुग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ॲपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25